ePaper
|| वर्ष - 8 । अंक - 308 || UDYAM-MH-26-0158827 ||

# इराण-इस्रायल युद्धामुळे पाकिस्तान बेहाल, सगळे पेट्रोल पंप बंद; आली रडण्याची वेळ!



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- जैस्वालकडे मोठा रेकॉर्डची संधी!
- मोठ्या खेळाडूने निवृत्तीचा सल्ला दिला
- इस्रायलचे पुन्हा इराणवर हल्ले!
- सोनमचे अन् भावाचीही नार्को टेस्ट


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 17 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






ePaper
इराण-इस्रायल युद्धामुळे पाकिस्तान बेहाल, सगळे पेट्रोल पंप बंद; आली रडण्याची वेळ!
| वर्ष - 8 | अंक - 308 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- जैस्वालकडे मोठा रेकॉर्डची संधी!
- मोठ्या खेळाडूने निवृत्तीचा सल्ला दिला
- इस्रायलचे पुन्हा इराणवर हल्ले!
- सोनमचे अन् भावाचीही नार्को टेस्ट

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 17 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इस्रायल × इराण, रशिया × युक्रेन युद्धे पेटलीत ; भारत-पाक संघर्ष संपेना !

# महायुद्धाच्या उंबरठ्यावर !

## भल्याभल्या देशांची युद्धामध्ये उडी, अमेरिकेला युद्धे पेटवायची आहेत? सध्या तरी भारत तटस्थ !

| मुंबई / पुणे / बीड | प्रतिनिधी | महाईन्यूज



**संपूर्ण जगावर सध्या युद्धाचे ढग असून कोणत्याही क्षणी महायुद्ध पेटण्याची चिन्हे आहेत. कोणीही माघार घेण्यास तयार नाही. अशातच सर्वत्र अशांतता राहावी, या दृष्टीने अमेरिकेची पावले आहेत. रशिया आणि युक्रेन यांचे युद्ध थांबण्याचे नाव घेत नसताना सध्या इस्रायल आणि इराण यांचे तुंबळ युद्ध सुरू झाले आहे. भारत आणि पाकिस्तान संघर्ष थांबला असला तरी अशांतता आणि तणाव कायम आहे. थोडक्यात, संपूर्ण जगच महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे.**

### संपूर्ण जग विनाशाच्या खाईत...

तिसरे जागतिक महायुद्ध आता कोणत्याही क्षणी सुरू होण्याची शक्यता असून जग विनाशाच्या खाईत ढकलले जात असल्याचे स्पष्ट दिसते. रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या चार वर्षांपासून युद्ध पेटले आहे. तिकडे इस्त्रायल - पॅलेस्टाईनमध्ये युद्ध सुरू असतानाच इस्रायल - इराण यांच्यातही जीवघेणे मिसाईल हल्ले सुरू झाले आहेत. भारत - पाक संघर्ष धुमसतोच आहे. पाकच्या बाजूने चीन, तुर्कस्तान, अझरबैजान ही राष्ट्रे उभी राहिली आहेत. सध्याचा इस्त्रायल - इराणमध्ये युद्धाचा भडका फारच चिंताजनक अवस्थेत आहे. जीव घेणे बॉम्ब हल्ले आणि प्रचंड जीवितहानी दिसत आहे.

### इस्रायलच्या मदतीचा दुष्परिणाम..

मध्य-पूर्वेतील युद्धाची स्थिती भयावह बनली आहे. अमेरिका, ब्रिटन किंवा फ्रान्सने इस्त्रायलला मदत करण्याचा प्रयत्न केला, तर या देशांच्या लष्करी तळांवर हल्ले करू, असे इराणने उघडपणे धमकावले आहे. इस्त्रायलवरील हल्ले थांबवा, नाहीतर तेहरानला आग लावू, असे इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी बजावले आहे. त्याच रात्री इराणने राजधानी तेल अविववर क्षेपणास्त्रे टाकून इस्त्रायलचे प्रचंड नुकसान केले असल्याचे इराणचे म्हणणे आहे.

### ट्रम्प यांना इराणची धमकी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणने धमकावले असून आमच्या भानगडीत पडू नका, उगाच नाक खुपसू नका, तुम्हाला महाग पडेल, असे इराणचे सर्वेसर्वा खोमेनी यांनी सुनावले आहे. अमेरिकेच्या विरोधात संपूर्ण मुस्लिम राष्ट्रांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे.

### इराणच्या अण्वस्त्र केंद्रावर बॉम्ब हल्ले

इस्त्रायलने इराणच्या अण्वस्त्र केंद्रांवर जोरदार हल्ले केले आहेत. इराणमधील फोर्डो अण्वस्त्र केंद्रावर जोरदार स्फोट झाले. त्याचे आवाज परिसरात अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आले. त्यानंतर या परिसरात भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. या ठिकाणी आलेल्या भूकंपाची तीव्रता २.५ रिश्टर स्केल होती. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर झालेल्या जोरदार स्फोटामुळे भूकंप आल्याचे म्हटले जात आहे. इराणनेही पलटवार करत इस्त्रायलवर १०० क्षेपणास्त्रे डागली आहेत.

### इराणचे प्रचंड नुकसान..

इराण इंटरनॅशनलकडून एक्सवर एक व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. त्यात म्हटले की, कोम शहरापासून २० किलोमीटर अंतरावर स्फोटांचे मोठे आवाज आले. या स्फोटानंतर भूकंप झाला. त्या स्फोटात आणि भूकंपात किती नुकसान झाले, त्याची माहिती मिळाली नाही. परंतु फोर्डो अणू उर्जा केंद्राचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

### भयावह हल्ले, प्रचंड जीवितहानी..

गेल्या चार दिवसांपासून दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले सुरु आहेत. इस्त्रायलमध्येही इराणच्या हल्लामुळे नुकसान झाले आहे. दोन्ही देशांची मोठी जीवितहानी झाली आहे. इराण आणि इस्त्रायल दोन्ही देश मागे हटण्याच्या तयारीत नाही. नेतान्याहू यांनी इराणवर हल्ले सुरुच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. जोपर्यंत इराणची अणू उर्जा केंद्रे पूर्ण नष्ट होणार नाही, तोपर्यंत हल्ले करण्यात येणार असल्याचे नेतान्याहू यांनी म्हटले आहे.

### कोणता देश कोणाच्या बाजूने ?

इस्रायल आणि इराण यांच्यामधील युद्धामध्ये संपूर्ण जगातील प्रमुख देशांची जवळजवळ फाळणी झाली आहे. हा संघर्ष अतिशय तीव्रतेने उफाळला आहे. यामध्ये अमेरिकेने उघड उघड इस्रायलच्या बाजूने भूमिका घेतली आहे, त्यामुळे रशिया हा इराणच्या बाजूने उभा आहे. भारताची भूमिका तटस्थ असल्याचे सांगण्यात येते. भारताचे इराण आणि इस्रायल या दोघांशीही चांगले व्यापारी संबंध आहेत आणि ते दृढ होतील, असे सांगण्यात येते. सौदी अरेबिया इराणच्या बाजूने उभा ठाकला आहे. फ्रान्स, कतार, पाकिस्तान, तुर्कस्तान, उत्तर कोरिया हे देश मात्र इराणच्या बाजूने उभे असल्याचे चित्र आहे.

# कुंडमळ्यातील शोधकार्य थांबवले!

## उपचारानंतर 35 जखमी घरी; 15 जणांवर उपचार सुरू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कुंडमळा येथील लोखंडी पादचारी पूल कोसळून रविवारी झालेल्या दुर्घटनेनंतर काही जण पाण्यात वाहून गेल्याच्या शक्यतेने सोमवारी (१६ जून) दुपारी दोन वाजेपर्यंत शोधमोहीम राबविण्यात आली. बोटी, ड्रोनद्वारे शोध घेण्यात आला. मात्र, कोणीही आढळून आले नाही; तसेच कोणी बेपत्ता असल्याची तक्रार नसल्याने शोधकार्य थांबविण्यात आले. दरम्यान, ५० जखमींपैकी ३५ जणांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे.**



जखमींपैकी ११ जणांवर अतिदक्षता विभागात, तर चौघांवर सर्वसाधारण कक्षात उपचार सुरू आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत वर्षा विहारासाठी आलेले पर्यटक रविवारी नदीपात्रात पडले. चार पर्यटक मृत्युमुखी पडले, तर ५० जण जखमी झाले. काही पर्यटक इंद्रायणी नदीत वाहून गेल्याच्या शक्यतेने सोमवारी शोधकार्य राबविण्यात आले. पोलिसांनी रायगड आपत्ती व्यवस्थापन पथक, वन्यजीव रक्षक मावळ, शिवदुर्ग मित्र लोणावळा या स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथकांसह शोधमोहीम राबविली. बोटींमधून तसेच ड्रोनद्वारेही नदीपात्रात शोधकार्य करण्यात आले. परंतु, कोणीही आढळून आले नाही. आणखी कोणी व्यक्ती बेपत्ता असल्याची तक्रारही पोलिसांकडे आली नसल्याने शोधकार्य थांबविण्यात आले. तळेगाव एमआयडीसीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव यांनी ही माहिती दिली.म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांना बेपत्ता नागरिकांबाबत लक्ष ठेवण्यास कळविण्यात आले आहे. पाण्यात सहा दुचाकी बुडाल्या होत्या. त्यांच्या मालकांचा शोध लागला असून, त्यातील एक दुचाकी मृत्यू झालेले रोहित माने यांची आहे. कोसळलेला पूल रहदारीसाठी बंद करण्यात आला होता. त्याबाबत पुलाच्या सुरुवातीला फलकदेखील लावण्यात आला आहे. असे असताना नागरिक या पुलाचा रहदारीसाठी वापर करत होते. केवळ पादचाऱ्यांसाठी असलेल्या या पुलावरून नागरिक दुचाकीही घेऊन जात होते. एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी झाल्याने पूल कोसळल्याचे स्थानिकांनी सांगितले.कुंडमळा येथील पूल कोसळल्याने स्थानिकांची मोठी गैरसोय झाली. बेगडेवाडी रेल्वे स्थानकाकडे येणाऱ्या शेलारवाडी, कुंडमळा, सांगुर्डी, इंदोरी, कान्हेवाडी, येलवाडी, सुदवडी या भागातील सुमारे २० हजार नागरिकांचा संपर्क तुटला आहे. विद्यार्थी, दूध विक्रेते, फूल विक्रेते, शेतकरी यांना पिंपरी-चिंचवड, पुणे शहराकडे येण्यासाठी इंदोरी मार्गे तळेगाव दाभाडे असा १४ किलोमीटर अंतराचा वळसा घालावा लागणार आहे.शेलारवाडी येथे संरक्षण दलाच्या डेपोकडून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी इंद्रायणी नदीवर नवीन पूल बांधण्यासाठी शासनाने आठ कोटी रुपयांचा निधी ११ जुलै २०२४ रोजी मंजूर केला आहे. पुलाची संरचना, निविदा प्रक्रिया, संरक्षण विभागाची मान्यता यामध्ये एक वर्षाचा कालावधी गेला. १० जून २०२५ रोजी पुलाच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिला आहे. पण, अद्याप कामाला सुरुवात झाली नाही.जखमींपैकी ११ जणांवर अतिदक्षता विभागात, तर चौघांवर सर्वसाधारण कक्षात उपचार सुरू आहेत.

### पूल बंद असतानाही पर्यटकांची गर्दी

कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत वर्षा विहारासाठी आलेले पर्यटक रविवारी नदीपात्रात पडले. चार पर्यटक मृत्युमुखी पडले, तर ५० जण जखमी झाले. काही पर्यटक इंद्रायणी नदीत वाहून गेल्याच्या शक्यतेने सोमवारी शोधकार्य राबविण्यात आले. पोलिसांनी रायगड आपत्ती व्यवस्थापन पथक, वन्यजीव रक्षक मावळ, शिवदुर्ग मित्र लोणावळा या स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथकांसह शोधमोहीम राबविली. बोटींमधून तसेच ड्रोनद्वारेही नदीपात्रात शोधकार्य करण्यात आले. परंतु, कोणीही आढळून आले नाही. आणखी कोणी व्यक्ती बेपत्ता असल्याची तक्रारही पोलिसांकडे आली नसल्याने शोधकार्य थांबविण्यात आले.

# डोळ्यांसमोर मृत्यू दिसत होता!

## मृत्यूच्या दाढेतून सुटलेल्या पती-पत्नीने सांगितला अनुभव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याच्या मावळमध्ये कुंडमळा येथे लोखंडी अरुंद पूल कोसळून चार जणांचा मृत्यू झाला. ५० पेक्षा अधिक जण जखमी असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातात कासारवाडी येथील पती पत्नी सुदैवाने बचवले आहेत. योगेश आणि शिल्पा भंडारेलो अशी त्यांची नाव आहेत. दोघे ही कुंडमळा येथे निसर्गाचा आणि निखळ वाहणाऱ्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी आले होते. यावेळी योगेश यांनी त्यांचा थरारक अनुभव सांगितला आहे. योगेश आणि शिल्पा यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. दोघांचा पाय फॅक्चर झाला आहे.**





योगेश म्हणाले, देवाच्या कृपेने त्या घटनेतून आम्ही वाचलो. माझी पत्नी आणि मी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी तिथे गेलो होतो. पूल कोसळला त्याच्या मधोमध आम्ही होतो. त्यामुळे आम्ही आत अडकलो. पुढे- मागे जाता आलं नाही. पूल हालत होता, डगमगत होता. पुढे ते म्हणाले, पूलावर दुचाकी आणल्या जात होत्या. त्यांना आम्ही सांगत होतो. दुचाकी आणू नका. पुढे ते म्हणाले, मंदिरात जाण्यासाठी अनेक त्या लोखंडी पूलाचा आधार घेत होते. मोठी गर्दी झाली होती. घटना घडली तेव्हा डोळे बंद केले होते. डोळ्यासमोर मृत्यू दिसत होता. जगेल याची शास्वती नव्हती. माझी पत्नीला आणि माझ्या पायाला फॅक्चर झालं आहे. स्थानिकांनी आम्हाला मदत केली. जीव वाचवण्यापेक्षा काही जण फोटो काढत होते. वाचवा -वाचवा म्हणत होतो. अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. स्थानिक नागरिकांनी आम्हाला वाचवलं आहे.

पुलावर जाण्यास बंदी होती. सर्वांनी सुरक्षित पर्यटन करावं. अस आवाहन यावेळी योगेश यांनी पर्यटकांना केलं आहे.मदतीसाठी याचना करताना योगेश आणि त्यांच्या पत्नीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. योगेश मदतीसाठी याचना करताना दिसत आहेत. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यासंबंधीचा थरारक अनुभव त्यांनी लोकसत्ताला ऑनलाइन ला सांगितला आहे.योगेश म्हणाले, देवाच्या कृपेने त्या घटनेतून आम्ही वाचलो. माझी पत्नी आणि मी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी तिथे गेलो होतो. पूल कोसळला त्याच्या मधोमध आम्ही होतो. त्यामुळे आम्ही आत अडकलो. पुढे- मागे जाता आलं नाही. पूल हालत होता, डगमगत होता. पुढे ते म्हणाले, पूलावर दुचाकी आणल्या जात होत्या. त्यांना आम्ही सांगत होतो. दुचाकी आणू नका. पुढे ते म्हणाले, मंदिरात जाण्यासाठी अनेक त्या लोखंडी पूलाचा आधार घेत होते. मोठी गर्दी झाली होती. घटना घडली तेव्हा डोळे बंद केले होते. माझी पत्नीला आणि माझ्या पायाला फॅक्चर झालं आहे. स्थानिकांनी आम्हाला मदत केली.

### वाचवा -वाचवा म्हणत होतो

अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. स्थानिक नागरिकांनी आम्हाला वाचवलं आहे. पुलावर जाण्यास बंदी होती. सर्वांनी सुरक्षित पर्यटन करावं. अस आवाहन यावेळी योगेश यांनी पर्यटकांना केलं आहे.मदतीसाठी याचना करताना योगेश आणि त्यांच्या पत्नीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. योगेश मदतीसाठी याचना करताना दिसत आहेत.

## मुसळधार पावसामुळे पर्यटकांना मात्र प्रतिबंध!

# लोणावळ्यातील भुशीडॅम ओव्हरफ्लो!

## धरणाच्या सांडव्याच्या पायऱ्यांवर पाण्याचा जोरदार प्रवाह

| लोणावळा |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**लोणावळ्यात सुरू असलेल्या संततधार व मुसळधार पावसामुळे पर्यटकांचे सर्वाधिक आकर्षण असलेले लोणावळ्यातील भुशी डॅम सोमवारी मध्यरात्री ओव्हरफ्लो झाले आहे. धरणाच्या सांडव्याच्या पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात खळखळ वाहणाऱ्या पाण्यात चिंब भिजण्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी मागील काही दिवसांपासून आतुरलेल्या पर्यटकांसह येथील स्थानिक व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**



डॅम ओव्हरफ्लो झाल्याची माहिती मिळताच पर्यटकांनी आपला मोर्चा भुशी डॅमच्या दिशेने वळवला आहे. लोणावळ्यात सोमवारी रात्री १४३ तर पवना धरण पाणलोट क्षेत्रात ५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. मावळातील नद्या, नाले व ओढ्यांना पूर आले असुन, धरणांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊ लागली आहे.

लोणावळा परिसरामध्ये अनेक महत्त्वाची पर्यटन स्थळे आहेत. मात्र पर्यटकांचे सर्वात आकर्षण असलेले भुशीडॅम हे सोमवारी मध्यरात्री ओव्हरफ्लो झाले असून, डॅम ओव्हरफ्लो झाल्याची माहिती कळताच डॅमच्या पायऱ्या वरून ओसंडून वाहणाऱ्या पाण्यात चिंब भिजण्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटक गर्दी करू लागले आहे. मात्र धरणाच्या सांडव्याच्या पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहत असल्यामुळे पर्यटकांना पायऱ्यावर बसून पाण्यात भिजण्याचा आनंद घेता आला नाही. यामुळे त्यांचा हिरमोड झाला. धरणाच्या सांडव्याच्या पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहत असल्याचे समजातच या ठिकाणी कोणत्याही पर्यटकांनी धोकादायक रित्या पाण्यात उतरू नये यासाठी लोणावळा शहर पोलिसांनी भुशी डॅमकडे घेत आलेल्या पर्यटकांना पाण्यात जाण्यास प्रतिबंध केला.

### पंधरा दिवस आधीच डॅम ओव्हर फ्लो

काही दिवसांपासून लोणावळा शहर व परिसरासह मावळात पावसाने चांगली हजेरी लावली आहे. त्यामुळे यावर्षी भुशीडॅम लवकरच ओव्हरफ्लो झाले आहे. गतवर्षी ३० जूनला डॅम ओव्हरफ्लो झाले होते. डॅम ओव्हरफ्लो झाल्यामुळे पर्यटकांसह पर्यटनावर विसंबून असलेल्या पर्यटन स्थळांवरील व्यावसायिकांची प्रतीक्षा आता संपली आहे.

### सुरक्षित पर्यटनाचा आनंद घ्या

लोणावळा खंडाळा व मावळातील विविध पर्यटन स्थळांवर पर्यटनासाठी येणाऱ्या काही पर्यटकांच्या बेफिकीरीमुळे व हुल्लडबाजीमुळे दुर्घटना घडत आहेत. पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद लुटताना स्वतःसह इतरांची काळजी घेत सुरक्षितरित्या पर्यटनाचा आनंद घ्यावा. आपल्यासह दुसऱ्यांच्या जीवाला धोका होईल असे वर्तन करू नये. तसेच स्टंटबाजी, हुल्लडबाजी, बेफिकीरी, प्रवास करताना वाहतूकीला अडथळा निर्माण करु नये, गैरवर्तन करु नये असे आवाहन पोलिस व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## भेटीलागीं जीवा लागलीसे आस!

## आळंदी आणि देहू पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**आळंदी आणि देहू येथून पंढरपूर कडे पालखी प्रस्थान ठेवण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत येत्या 18 जून रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज तर 19 जून रोजी आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. यानिमित्ताने देहू आणि आळंदी संस्थान, पोलीस प्रशासन, स्थानिक महापालिका नगरपरिषद यांच्याकडून तयारीचा अंतिम आढावा घेतला जात आहे.**




श्री. संत तुकाराम महाराज यांच्या वतीने पालखीच्या तयारीचा अंतिम आढावा घेतला जात आहे. विश्वस्तांच्या वतीने पालखी रथाची पाहणी करण्यात आली.

श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने पालखी तयारीच्या कामांवर अखेरचा हात फिरविला जात आहे. पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे, वैभव महाराज मोरे व गणेश महाराज मोरे, संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त लक्ष्मण महाराज मोरे, उमेश महाराज मोरे व विक्रमसिंह महाराज मोरे आदी या तयारीवर लक्ष ठेवून आहेत. श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाला आठ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू आहे. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काम सुरू आहे. त्याचप्रमाणे रथाच्या आतील बाजूला टीव्ही स्क्रीन, एलईडी विद्युत दिवे व जनरेटर बसविण्यात आला असून, त्याची चाचणी घेऊन तपासणीही करण्याचे काम सुरू होते.

### पावसापासून बचावासाठी इनामदार वाड्यात मंडप

संत तुकोबांच्या पालखीचा पहिला मुक्काम येथील इनामदार वाड्यात असतो. या वाड्यात भाविकांची गर्दी होऊ नये, पावसापासून बचाव व्हावा, यासाठी मंडप घालण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यावेळी इनामदार वाड्यात सजावट करण्याचे काम सुरू आहे.

### देहूतील मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरु

१ मंदिराला चहूबाजूंनी रोषणाईच्या कामाला रविवारी सुरुवात करण्यात आली आहे. तसेच पांडुरंगाच्या मंदिराच्या कळसाला, श्री संत तुकाराम महाराज मंदिराच्या कळसाला व मंदिराला, भजनी मंडप, महाद्वार येथे फुलांची सजावट करण्यात येणार आहे.

२ मंदिरात पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून, नित्य हरिपाठ, गाथा वाचन व अभंग गायन, कीर्तन अशा कार्यक्रमांनाही सुरुवात झाली असून, या सप्ताहाची सांगता पालखी प्रस्थानाच्या दिवशी होणार आहे.


३ भाविकांसाठी गाथा रास्त भावात उपलब्ध केल्या आहेत. भविष्यात गाथा छापण्यासाठी राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी एक कोटी रुपये शासनाच्या वतीने दिले आहेत, तेही संस्थानकडे जमा झाले आहेत

देहूगाव येथून १८ जूनला दुपारी श्री संत तुकाराम महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पिंपरी चिंचवडच्या बीडीएस विभागाच्या शौर्य या प्रशिक्षित श्वानाच्या मदतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, श्री संत तुकाराम मंदिर, भजनी मंडप, संस्थानचे कार्यालय, मंदिराच्या ओवऱ्या, देऊळवाड्याच्या तटबंदीच्या बाहेरील भाग, इंद्रायणी नदीचा घाट परिसर, वैकुंठगमन मंदिर परिसर, भक्त निवास, गाथा मंदिर व मंदिर परिसर या ठिकाणांची तपासणी करण्यात आली.

### आळंदीत पालखी प्रस्थान सोहळ्याची जय्यत तयारी

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुख डॉ. भावार्थ देखणे म्हणाले, ‘दरवर्षी सायंकाळी पाचच्या दरम्यान पालखीचे प्रस्थान होत असते. मात्र, यंदा प्रस्थान सोहळा गुरुवारी आल्याने परंपरेप्रमाणे नित्य गुरुवारची माउलींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि आरती झाल्याशिवाय पालखीचे प्रस्थान करता येणार नाही. पालखी प्रस्थान सोहळ्यास दिरंगाई होऊ नये यासाठी नित्य गुरुवारची पालखीची मंदिर प्रदक्षिणा सायंकाळी साडेपाचच्या दरम्यान काढली जाणार आहे. त्यानंतर आरतीचा कार्यक्रम साडेसात वाजता होईल. मानाच्या ४७ दिंड्यांना देऊळवाड्यात प्रवेश दिला जाणार आहे. रात्री आठनंतर पालखीचे प्रस्थान होईल. चांदीच्या रथाला पॉलिश करण्यात आले आहे. देवांचे राजेशाही अलंकार, चांदीचे भांडे, सिंहासन अशी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. श्री गुरू हैबतबाबांनी ठरवून दिलेल्या प्रथेप्रमाणे सोहळा पार पडेल. देवस्थान प्रतिनिधी, जिल्हा प्रशासन, दिंडीकरी, फडकरी, मानकरी, पोलीस यंत्रणा, गावकऱ्यांसमवेत बैठका झाल्या आहेत. आता प्रस्थान सोहळ्याची प्रतीक्षा आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### परमार्थ श्रद्धेने करावा

आपण मनुष्यजन्माला आलो, ते भगवंतप्राप्तीकरिताच आलो. आत्तापर्यंत मी पुष्कळ योनी हिंडलो, भगवंताने आता मनुष्य-योनीत आणले. ' भगवंता, आता नाही तुला विसरणार ' असे कबूल करूनही, आपण जन्मास आलो नाही तर लगेच 'तू कोण ?' असे म्हणू लागतो ! संत आपल्याला, ' तोच मी ' असे भगवंताजवळ कबूल करून आल्याची आठवण करून देतात. पण संतांनी जागे केले तरी आम्ही मात्र पुन: तोंडावरून पांघरूण ओढून घेतो, याला काय करावे ? झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करणे कठीणच जाते. पुष्कळ तीर्थयात्रा केल्या पण होतो तसाच राहिलो; यात दोष गंगेचा का माझा ? ' गंगेच्या काठी कितीतरी लोक येतात, स्नान करतात, पूजाअर्चा करतात, मग हे कलियुग आहे असे कसे म्हणावे ?' असे एकाने म्हटले. त्यावर दुसरा म्हणाला, ' याचे प्रत्यंतर समोरच दाखवतो. समोर एक रक्तपिती माणूस बसला आहे. त्याला जो पापी नसेल त्याने कवटाळावे म्हणजे त्याची रक्तपिती जाईल. पण एवढे होईल, की जर कवटाळणारा पापी असेल तर त्याला त्या माणसाची रक्तपिती होईल. ' असे समजल्यावर जो तो हळूहळू तिथून पसार होऊ लागला ! म्हणजे, एवढे नेमनिष्ठ, विद्वान्, गंगामाईचे रोज स्नान करणारे, तरी आपले अंत:करण शुद्ध झाले आहे असे त्या कुणालाच वाटले नाही ! तेवढ्यात वऱ्हाडकडला एक गरीब शेतकरी घोंगडी पांघरून हातातली काठी टेकीत टेकीत येत होता. त्याची निष्ठाच अशी की, गंगेत स्नान केले की सर्व पापे नष्ट होतात. त्याने गंगेत बुडी मारली आणि वर येऊन त्या रोग्याला कडकडून भेटला; आणि आश्चर्य म्हणजे त्या रोग्याचा रोग एकदम बरा झाला ! असे हे जे गोरगरीब, भोळेभाळे लोक, त्यांच्याजवळ अंधश्रद्धेने जे येते, ते मोठ्या विद्वानांनाही साधत नाही. आपण व्यवहारात पुष्कळ ठिकाणी अंधश्रद्धा ठेवतो. घरून कचेरीला निघताना वेळेवर आपण पोहचू अशी अंधश्रद्धा आपली असतेच. कधी कधी आकस्मिक कारणाने आपण कचेरीला पोहचू शकत नाही; तरीपण आपण भरवसा ठेवतोच ! व्यवहारात आपण एकमेकांवर जेवढी निष्ठा ठेवतो, तेवढी जरी भगवंतावर ठेवली, तरी भगवंत आपल्याला समाधान देईल. परमार्थ पूर्ण समजून तरी करावा, किंवा अडाण्यासारखा श्रद्धेने करावा. पण आपण आहोत अर्धवट; म्हणजे पूर्ण कळलेले नसून आपल्याला ते कळले आहे असे वाटते. अशा माणसाला शंका फार, आणि त्याचे समाधान करणेही फार कठीण जाते. अमुक एक खरे आहे असे कळूनसुद्धा ज्याला आचरणात आणता येत नाही, तो मनुष्य खरा अज्ञानी. जे अनुभवाने सुधारले तेच शहाणे भले !

बोधवचन:- परमार्थामध्ये अंधश्रद्धेची मुळीच गरज नाही. पण तेथे श्रद्धेशिवाय मुळीच चालायचे नाही.

# कसं काय पाटील बरं हाय का..? जयंत पाटलांची राजकीय घुसमट !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे विनंती केली आणि आपल्याला या जबाबदारीतून मुक्त करावे असे सांगितले. अर्थात, नेहमीप्रमाणे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय घेऊ, असा आदेश शरद पवार यांनी दिला. आता पाहू काय होते ते!**



### नेमके कारण काय असावे?

पण, या घटनेमुळे एक गोष्ट लक्षात आली की जयंत पाटील यांची शरद पवार यांच्या गटात नक्कीच घुसमट होत आहे..मग, ती रोहित पवार यांच्यामुळे असो, नाहीतर सुप्रिया सुळे यांच्यामुळे ! किंवा देवेंद्र फडणवीस यांच्या मैत्रीमुळे..पण, त्यांचे त्या पक्षात मन लागत नाही हे नक्की ! थोडक्यात काय, जयंत पाटील अस्वस्थ नक्की आहेत. पण, कशामुळे?

### सर्व सहकारी सत्तेत असल्यामुळे ?

अस्वस्थ किंवा निराश आहेत असे दाखवणारी किंवा अशा प्रकारची वक्तव्ये जयंत पाटील हे गेले वर्षभर करत आहेत. वर्षभरातील नानाविध वक्तव्यांतूनही, असे म्हणता येईल. त्यांचे सर्व सहकारी सत्तेत आहेत आणि हे सत्तेच्या बाहेर.. ते अस्वस्थ असणे साहजिकच आहे. विधानसभेचा झटका देणारा निकाल, स्वतःचे आणि मुलाचे राजकीय भवितव्य, चौकशीची प्रकरणे यासारखी कारणे अस्वस्थतेच्या मुळाशी आहेत, हे कोणाच्याही लक्षात येईल.

### पक्षाध्यक्षपदी नवा चेहरा द्या..

शरद पवार यांच्या पक्षाचे ते प्रदेशाध्यक्ष आहेत. या पदाच्या जबाबदारीतून मला मुक्त करा, अशी विनंती त्यांनी केली आणि त्यांच्या बिनविरोध निवडीसही पुढे ढकलण्यात आले. यावेळी पाटील म्हणाले होते, माझ्यावर अनेक जबाबदाऱ्या आहेत. पक्ष संघटनेचे काम, चौकशीचे प्रश्न, त्यामुळे नवा चेहरा पक्ष संघटनेसाठी मिळणे आवश्यक आहे. यातून त्यांना नेमके काय सूचित करायचे होते, हे मात्र ज्यांना समजायचे त्यांना नक्की समजले !

### भाजपाचा मार्ग स्वीकारणार ?

गेल्या वर्ष-दीड वर्षांकडे वळून पाहिले तर जयंत पाटील यांच्या संदर्भात कोणत्या गोष्टी सतत चर्चेत होत्या? तर ते भाजपात जाणार, राज्याच्या मंत्रिपदी वर्णी लागणार ! या आणि अशा चर्चा सतत होत. यामागे अनेक कारणे होती, त्यातील महत्वाचे म्हणजे जयंत पाटील यांच्या अनेक जवळच्या सहकाऱ्यांनी भाजपात मानाच्या जागा बळकावल्या आहेत. दुसरे कारण म्हणजे त्यांच्या विरोधातील चौकशी.. सातत्याने होणाऱ्या चौकशा, त्यातील अनियमितता, त्यांचे 'महाविकास आघाडी' तील बालमित्र यांना झालेला त्रास अस्वस्थतेचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे.

### अजित पवार यांच्या पूर्वीच..

वास्तविक, अजित पवार यांनी महायुतीशी मैत्री करण्यापूर्वीच जयंत पाटील जाणार हे निश्चित झाले होते, पण त्यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद सोपवून शरद पवार यांनी त्यांचे मनसुबे उद्ध्वस्त केले, असे उघडपणे बोलले जात होते. अजित पवारांपूर्वी ते गेले असते तर कदाचित राजकारणाचे ठोकताळे आणि वेगवेगळी समीकरणे बदलली असती. त्यातच आता सांगली जिल्ह्याच्या राजकारणातही त्यांचे स्थान नगण्य झाल्याचे म्हणावे लागेल!

### ही तर जयंत'नीती'

शरद पवार आणि जयंत पाटील यांच्या राजकीय वर्तनामध्ये काही साम्य स्पष्ट दिसून येते. समोरच्याचा कोणत्याही गोष्टींचा स्पष्ट उल्लेख न करता, थेट दोषारोपाचे नाव न उच्चारता, वळणदार भाषेत उल्लेख करतात. ग्रामीण भागातील उदाहरणे देतात. अर्थात्, जयंत पाटील हे देखील शरद पवारांच्या तालमीतच तयार झाले आहेत.

### राष्ट्रवादी फुटली, आणि..

राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि शरद पवार आणि जयंत पाटील यांच्या जवळच्या अनेक कार्यकर्त्यांनी आणि मित्रांनी अजित पवार गटात प्रवेश केला, जयंत पाटील यांना दिलेले स्थान जर स्वीकारले असते तर कदाचित आजची वेळ आली नसती. जयंत पाटील यांचे वक्तव्य 'शांत राहा, जरासं थांबा, वाट पाहा आणि मग निर्णय घ्या' असे त्यांनी कार्यकर्त्यांना दिलेले आदेश, त्यांच्या अस्वस्थतेची ग्वाही देतात. गाडीची हालचाल सुरू आहे, त्या गाडीत अजित पवार, एकनाथ शिंदेंसारखे नेते अगोदरच बसलेले आहेत. या नेत्यांमध्ये ते राजकीयदृष्ट्या अडकले गेले आहेत पण त्यांच्या बरोबरीची पदे जयंत पाटील यांच्याकडे नाहीत, हे देखील एक कारण असू शकते.

### जयंत पाटलांची कोंडी..

जयंत पाटलांचा इतिहास पाहिला तर मोठमोठी मंत्रिपदे, दूरदृष्टी आणि विकासात्मक हालचाली हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे. राजकारणातील आता बदलत्या परिस्थितीनुसार ते काहीच करू शकत नाहीत, अशी राजकीय समीकरणे झाली आहेत. विरोधी पक्षात बसून पुढील साडे चार वर्षे फक्त सत्ताधाऱ्यांच्या निर्णयाकडे पाहत बसणे आणि टीका करणे, एवढेच हातात राहते. सत्ताधाऱ्यांकडे जावे, तर त्यांच्याबरोबरचे सर्व नेते मोठी मंत्रीपदे बळकावून बसले आहेत. अशा परिस्थितीत निर्णय काय घ्यायचा हे त्यांना सुचत नसावे.

### तोंड दाबून बुक्क्यांचा मार..

शरद पवार गटाशी एकनिष्ठ राहावे, तर रोहित पवार हे त्यांना मान द्यायला तयार नाहीत आणि शरद पवार यांचे अनुकूल फासे नेहमीच सुप्रिया सुळे यांच्या बाजूने पडत असल्यामुळे जयंत पाटील यांना भवितव्य काय हा मुद्दा पुन्हा शिल्लक राहतो ! आहे त्याच ठिकाणी थांबले तर राजकीय भवितव्य नाही, सत्ताधाऱ्यांच्याकडे जावे तर योग्य मान मिळेल की नाही, याची चिंता भेडसावत आहे.

### आज ना उद्या भाजपामध्ये..

सध्याच्या शरद पवार गटात जयंत पाटील यांची घुसमट होताना पाहिल्यावर ते भविष्यात काय निर्णय घेतात, हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे. शरद पवार यांचा गट जर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत सामील झाला किंवा विलीन झाला तर अनायसे जयंत पाटील देखील राष्ट्रवादीमध्ये जाऊन सत्ताधाऱ्यांशी हातमिळवणी केल्यासारखे होईल. पण, त्यापेक्षा एखादे मोठे आश्वासन पदरी पाडून जर थेट भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला तर मोठे पदही मिळू शकेल, असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे. जयंत पाटील यांची घुसमट भारतीय जनता पार्टीच्या पथ्यावर पडणारी आहे, हे मात्र निश्चित !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पीकहानी अनुदानाची चौकशी!

## चौकशी अहवाल सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अतिवृष्टीमुळे झालेली पीकहानी आणि शेतजमीन खरवडून गेल्याने झालेल्या नुकसानीबद्दल जालना जिल्ह्यात वितरित अनुदानातील गैरप्रकारची तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. आमदार नारायण कुचे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन अनुदान वितरणातील गैरप्रकाराबद्दल तक्रार करुन दोषींवर कारवाईची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी चौकशी आदेश दिलेले आहेत.**



विविध नऊ शासन निर्णयांद्वारे जिल्ह्यात पीकहानी अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. अनुदान वितरणातील गैरप्रकाराच्या चौकशीसाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्रिसदस्यीय वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीने सांख्यिकीय आधारावर अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत वितरित ७९ कोटी रुपयांपैकी ७२ कोटी रुपयांची तपासणी केली आहे . त्यामध्ये जवळपास ३५ कोटी रुपये अतिरिक्त प्रदान झाल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात नोटीसा बजावण्यात आलेल्या २६ पैकी १० तलाठ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी निलंबित केले आहे.जिल्ह्याच्या बाहेरील व्यक्तींना, बोगस सर्वे नंबरवर, शासकीय जमिनीवर अनुदान देणे इत्यादी गैरप्रकार चौकशीत समोर आले आहेत. गैरप्रकारे खात्यावर जमा झालेले जवळपास सहा कोटी रुपये अनुदान आतापर्यंत संबंधितांनी शासनाकडे परत केले आहे.

स्वतःच्या फायद्यासाठी गावातील व्यक्तींशी संगनमत करून त्यांच्या खात्यांवर अनुदान दिल्याचा आरोप गावपातळीवर नुकसानीचा अहवाल तयार करणाऱ्या शासकीय यंत्रणेवर आहे. ई-पंचनाम्याच्या माध्यमातून अनुदान वितरित झालेल्या पोर्टल वरील याद्यांची पडताळणी संबंधित गावांच्या संदर्भात चौकशी समिती करीत आहे. त्याचे स्वरूप सांख्यिकीय आहे.जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार बबनराव लोणीकर आणि अन्य सदस्यांनी अनुदान वितरणातील गैरप्रकाराबद्दल प्रश्न उपस्थित केले.

त्यावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यासंदर्भातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचे आश्वासन दिले.भविष्यात अशा प्रकारच्या अनुदान वितरणातील गैरप्रकार यांबविण्यासाठी उपाययोजना सूचविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२८ दरम्यान विविध नऊ शासन निर्णयांद्वारे जिल्ह्यात पीकहानी अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. अनुदान वितरणातील गैरप्रकाराच्या चौकशीसाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्रिसदस्यीय वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीने सांख्यिकीय आधारावर अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत वितरित ७९ कोटी रुपयांपैकी ७२ कोटी रुपयांची तपासणी केली आहे . त्यामध्ये जवळपास ३५ कोटी रुपये अतिरिक्त प्रदान झाल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात नोटीसा बजावण्यात आलेल्या २६ पैकी १० तलाठ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी निलंबित केले आहे.

### एका व्यक्तीस दोनदा अनुदान

गैरप्रकारे खात्यावर जमा झालेले जवळपास सहा कोटी रुपये अनुदान आतापर्यंत संबंधितांनी शासनाकडे परत केले आहे. स्वतःच्या फायद्यासाठी गावातील व्यक्तींशी संगनमत करून त्यांच्या खात्यांवर अनुदान दिल्याचा आरोप गावपातळीवर नुकसानीचा अहवाल तयार करणाऱ्या शासकीय यंत्रणेवर आहे. ई-पंचनाम्याच्या माध्यमातून अनुदान वितरित झालेल्या पोर्टल वरील याद्यांची पडताळणी संबंधित गावांच्या संदर्भात चौकशी समिती करीत आहे. त्याचे स्वरूप सांख्यिकीय आहे.जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार बबनराव लोणीकर आणि अन्य सदस्यांनी अनुदान वितरणातील गैरप्रकाराबद्दल प्रश्न उपस्थित केले. त्यावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यासंदर्भातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचे आश्वासन दिले.

# शाळा संस्कार घडविणारे मंदिर : एकनाथ शिंदे

## साताऱ्यात एकनाथ शिंदे यांनी केले चिमुकल्यांचे स्वागत

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**शाळा हे संस्कार घडविणारे मंदिर असून, या मंदिरात शिक्षक हे देशाची उज्ज्वल पिढी घडवीत असतात. विद्यार्थ्यांनीही कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती यासह सर्व विषयांमध्ये ज्ञानक्षम होण्यासाठी शिक्षकांना प्रतिसाद द्यावा. भरपूर अभ्यास करून मोठे व्हावे आणि देशाचा, तसेच राज्याचा लौकिक वाढवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**



कोडोली (ता. सातारा) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या शाळेचेही उद्घाटन श्री. शिंदे यांनी केले. या वेळी आमदार महेश शिंदे, मनोज घोरपडे आदी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राबवित आहोत, असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे. या शाळांमधील विद्यार्थी उच्च पदावर काम करीत आहेत. अनेक मोठ्या व्यक्तिमत्त्वांनी शासकीय शाळेमध्ये शिक्षण घेतलेले आहे.''शासनाचा भर आनंददायी शिक्षणावर आहे. विद्यार्थ्यांनी कोणताही दबाव न घेता शिक्षणाबरोबर खेळावरही भर दिला पाहिजे. सातारा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या माझी शाळा आदर्श शाळा उपक्रम हा राज्यभर राबविण्यात येत आहे. शिक्षण विभागात आमूलाग्र बदल केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थी स्पर्धांमध्ये टिकले पाहिजेत अशा पद्धतीने त्यांना शिक्षकांनीही दर्जेदार शिक्षण द्यावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांचे भाषण झाले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चॉकलेट देऊन स्वागत

साताऱ्यातील उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचे विठ्ठल माने यांनी सूत्रसंचालन केले.दरम्यान, कोडोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत केले. कोडोली (ता. सातारा) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी माझी शाळा आदर्श शाळा उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या शाळेचेही उद्घाटन श्री. शिंदे यांनी केले. या वेळी आमदार महेश शिंदे, मनोज घोरपडे आदी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राबवित आहोत, असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# इस्रायलचे पुन्हा इराणवर हल्ले!

## तेहरानच्या हवाई क्षेत्रावर नियंत्रण मिळवल्याचा केला दावा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इस्त्रायल आणि इराण या दोन देशांमध्ये प्रादेशिक तणाव कमालीचा वाढला आहे. यादरम्यान इस्त्रायले पुन्हा एकदा इराणवर हवाई हल्ले सुरु केले आहेत. इतकेच नाही तर इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इस्त्रायलच्या हवाई दलाने तेहरानच्या हवाई क्षेत्रावर नियंत्रण मिळवल्याचा दावा केला आहे.**



सकाळी इस्त्रायलच्या लष्कराने इराणच्या राजधानीवर एरियल सुपीरियरिटी म्हणजेट हवाई वर्चस्व मिळवल्याचा दावा केला होता.इस्त्रायलच्या लष्कराने सांगितले की, त्यांनी इराणच्या हवाई सुरक्षा आणि क्षेपणास्त्र प्रणालीचे इतके नुकसान केले की आता त्यांची विमाने कोणत्याही मोठ्या धोक्याशिवाय तेहरानवरून उड्डाणने करू शकतात.तर दुसरीकडे इराणमध्ये आतमध्ये घुसून इस्त्रायलने लक्ष्यांवर हल्ले केल्यानंतर इराणने देखील इस्त्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केला होता. यानंतर इस्त्रायलमध्ये संघर्षाच्या चौथ्या दिवशी मृतांची संख्या ११ वर पोहचली आहे. इस्त्रायल डिफेन्स फोर्सेस (IDF) ने एका एक्स पोस्टमध्ये असा दावा केला आहे की, त्यांनी शस्त्रे वाहून नेणारे अनेक ट्रक ज्यामध्ये जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र लॉंचर्सचाही समावेश होता, त्यांना शोधून काढले. हे सर्व ट्रक इस्त्रायली हल्ल्यांपासून वाचण्यासाठी पश्चिम इराणमधून तेहरानकडे जात होते परंतु त्यांच्या (इस्त्रायलच्या) लष्कराने त्यांना यशस्वीरित्या लक्ष्य केले आणि त्यांना निष्क्रिय केले.अनेक दशकांच्या शत्रुत्वानंतर इराण आणि इस्त्रायल यांच्यात संघर्ष सुरु झाला आहे.

इस्त्रायले शुक्रवारी अचानक इराणमध्ये अनेक ठिकाणांवर हवाई हल्ला केला. त्यांनी दावा केला ही त्यांच्या शत्रूला अण्वस्त्रे मिळू नयेत म्हणून आम्ही हा हल्ला केला. मात्र हे आरोप इराणने फेटाळले आहेत. इराणी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इस्त्रायलच्या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत किमान २२४ लोकांचा मृत्यू झाला आहे, ज्यात वरिष्ठ लष्करी कमांडर, अणुशास्त्रज्ञ आणि नागरिकांचा देखील समावेश आहे. तर याला प्रत्युत्तर देत इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्ड यांनी आपण इस्त्रायलमध्ये क्षेपणास्त्रे डागून यशस्वीरित्या हल्ला केल्याचे म्हटले आहे.सोमवारी इस्त्रायलमध्ये एकूण मृतांची संख्या ११ ने वाढल्याचे त्यांच्या पंतप्रधान कार्यालयाने म्हटले आहे, यामुळे शुक्रवारपासून इस्त्रायलमधील मृतांची संख्या २४ वर पोहोचली आहे.: इस्त्रायल आणि इराणमध्ये जोरदार संघर्ष सुरू आहे. दोन्ही देशांकडून एकमेकांच्या शहरात हवाई हल्ले करण्यात येत आहेत. त्यामुळे इराण आणि इस्त्रायलमध्ये मोठ्या प्रमाणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. इस्त्रायलकडून इराणमधील गॅस रिफायनरी आणि तेल डेपो लक्ष्य केले जात आहेत. तसेच इस्त्रायलच्या हवाई दलाने तेहरानच्या हवाई क्षेत्रावर नियंत्रण मिळवल्याचा दावा पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केला आहे. इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षाबाबत आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. इस्त्रायलने तेहरानमधील इराणच्या सरकारी टीव्ही स्टुडिओच्या मुख्यालयावर हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे.

### तेहरानमध्ये भीतीचं वातावरण

तेहरानमधील राष्ट्रीय टीव्ही वृत्तवाहिनी इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण ब्रॉडकास्टिंगच्या (IRIB) इमारतीवर बॉम्ब हल्ले करण्यात आले आहेत. या संदर्भातील एक व्हिडीओ समोर आला असून लाईव्ह प्रक्षेपण सुरु असताना अचानक हल्ला झाल्यामुळे अँकरला लाईव्ह प्रक्षेपणामधून पळून जात जीव वाचवण्याची वेळ आल्याचं व्हिडीओत दिसून आलं आहे.इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात काळ्या धुराचे लोट दिसून आले आहेत. इस्त्रायलने आयआरआयबी मुख्यालयावर केलेल्या हल्ल्यानंतरचा व्हिडीओ एका कॅमेऱ्यात कैद झाला असून आता हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

# सोनमचे अन् भावाचीही नार्को टेस्ट!

## "हत्या प्रकरणातील एकामागून एक नवीन व्हिडीओ समोर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंदोर येथील राजा रघुवंशी याची मेघालय येथे त्याची पत्नी आणि तिच्या सहकाऱ्यांनी मिळून हत्या केल्याची घटना घडली होती. या हत्या प्रकरणाची देशभरात चांगलीच चर्चा देखील झाली. दरम्यान आता राजा रघुवंशी याच्या मोठ्या भावाने सोमवारी या प्रकरणामध्ये मुख्य आरोपीं असलेल्या सोनमच्या कुटुंबियांचे नार्को-ॲनालिसीस केले जावे अशी मागणी केली आहे. याबरोबरच या हत्येमध्ये आणखी काहीजण सहभागी असल्याचा संशय देखील राजा रघुवंशीच्या कुटुंबियांनी केला**




पोलिसांनी २९ वर्षीय राजा रघुवंशी याची गेल्या महिन्यात हत्या केल्या प्रकरणी पाच आरोपींना अटक केली आहे. यामध्ये त्याची पत्नी सोनम तिचा कथित प्रियकर राज कुशवाह यांचा देखील समावेश आहे. आरोपी सध्या मेघालय पोलिसांच्या ताब्यात आहेत आणि एसआयटी कडून या प्रकरणाची तपास केला जात आहे.राजा रघुवंशीच्या तेराव्याच्या दिवशी त्याचा मोठा भाऊ विपिन रघुवंशी म्हणाला की, "सोनम, तिचे पालक, भाऊ गोविंद आणि वहिनी यांची नार्को-ॲनालिसीस चाचणी करावी अशी आमची मागणी आहे."सोनमवर हनिमूनला गेले असताना राज कुशवाह आणि इतर तीन जणांच्या मदतीने पतीची हत्या केल्याचा आरोप आहे. तर या प्रकरणातील इतर तीन आरोपी, विशाल चौहान, आकाश राजपूत आणि आनंद कुर्मी हे सुरूवातीला भाडोत्री मारेकरी असल्याचा संशय होता, पण नंतर पोलिसांना ते कुशवाहाचे मित्र असल्याचे आढळून आले आहे. विपिन रघुवंशी म्हणाला की , "हत्या प्रकरणाती एकामागून एक नवीन व्हिडीओ समोर येत आहेत. आम्हाला वाटते की माझ्या लहान भावाच्या हत्येमध्ये की आणखी लोकांचा सहभाग आहे."तसेच त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करणाऱ्यांचीही चौकशी केली जावी आणि त्यांनी हे व्हिडीओ आधी का पोस्ट केले नाहीत याची माहिती द्यावी.

### आणखी लोकांचा सहभाग

अशी मागणी देखील केली आहे. यातच त्याने मेघालय पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.असे असले तरी सोनमचा भाऊ गोविंद हा या विधीसाठी उपस्थित होता, यावर रघुवंशी कुटुंबियांनी त्याला निमंत्रण देण्यात आले नव्हते असे स्पष्ट केले. जर कोणी आमच्यावर संशय घेत असेल तर आम्ही चौकशीची करण्याची विनंती करत आहोत. आम्ही राजा रघुवंशी यांच्या कुटुंबियांबरोबर आहोत," असे त्याने माध्यमांना सांगितले. गोविंद हा राजा रघुवंशी याच्या १३ जून रोजी उज्जैन येथे झालेल्या अंत्यविधीसाठी देखील उपस्थित होता.इंदोर येथील राजा रघुवंशी याची मेघालय येथे त्याची पत्नी आणि तिच्या सहकाऱ्यांनी मिळून हत्या केल्याची घटना घडली होती.

# अमृता खानविलकरची 'फादर्स डे'निमित्त खास पोस्ट

१५ जून रोजी जगभरात फादर्स डे साजरा केला जात आहे. अशा परिस्थितीत, सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रत्येक जण आपल्या वडिलांवर प्रेमाचा वर्षाव करताना दिसत आहे. अनेक कलाकारांनी त्यांच्या वडिलांबरोबरचे फोटो शेअर केले आणि त्यांच्यासाठी भावनिक नोट्स लिहिल्या. मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर हिने वडिलांसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. अमृता खानविलकरने तिच्या वडिलांबरोबरचा एक फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. फादर्स डेच्या निमित्ताने तिने हा फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये अमृताची आईदेखील आहे. अनेकदा अमृता खानविलकर तिच्या आईचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. आज फादर्स डे निमित्ताने अमृताने वडिलांबरोबरचा फोटो शेअर करत पोस्ट लिहिली आहे.



अमृता खानविलकर या फोटोला कॅप्शन देत म्हणाली, "मीट राजू खानविलकर- आमचे पप्पा! चिरतरुण व्यक्तिमत्व (माझी त्वचा त्यांच्यामुळेच इतकी छान आहे). सतत पॉझिटिव्ह राहणारे, सतत भटकणारे, आयुष्याने पण खूप फिरवलं – गिरगांव ते विलेपार्ले ते कोथरुड... पण आता वर्ल्ड ट्रॅव्हलर असणारे! आमचे वडील म्हणून खूप स्ट्रिक्ट, पण आजोबा म्हणून एक वेगळ्याच ग्रहावरचे वाटतात – नातवंडांशी वेगळ्याच इंग्लिशमध्ये बोलणारे, ज्यांच्या फोनवर सतत अदितीचा फोटो वॉलपेपर म्हणून लावणारे. आमचे पप्पा...हॅपी फादर्स डे." अभिनेत्री अमृता खानविलकर ही सध्या मराठी इंडस्ट्रीमधील आघाडीची अभिनेत्री आहे. अमृता खानविलकर फक्त अभिनयातूनच नाही, तर दमदार नृत्य आणि सौंदर्याच्या जोरावरदेखील चाहत्यांच्या मनावर राज्य करत आहे. तिच्या प्रोफेशनल आयुष्याबरोबरच तिचं वैयक्तिक आयुष्यही चर्चेत राहिलं आहे. अमृताने हिमांशू मल्होत्राबरोबर काही वर्षांपूर्वी लग्न केलं.

## ऋषी कपूर नग्नावस्थेत होते

१९७३ साली आलेल्या 'बॉबी' चित्रपटातील एका सीनमध्ये दिवंगत ऋषी कपूर यांनी आपले नितंब दाखवले होते. ७० च्या दशकात एखाद्या अभिनेत्याने इतका बोल्ड सीन देणं ही खूप मोठी गोष्ट होती. या चित्रपटात ऋषी यांच्याबरोबर काम करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री अरुणा इराणी हा सीन करण्यास नकार दिला होता. ऋषी कपूर यांच्याबरोबर हा सीन करण्याची लाज वाटत होती, असं अरुणा इराणी यांनी सांगितलं. ऋषी कपूर यांचे वडील आणि चित्रपटाचे दिग्दर्शक राज कपूर यांनी अरुणाला हा सीन शूट करण्यास तयार केलं आणि ऋषी कपूर यांच्याकडे न पाहण्याचा सल्ला दिला. लेहरेन रेट्रोला दिलेल्या मुलाखतीत अरुणा म्हणाल्या की आधी त्या हा सीन करायला तयार नव्हत्या, पण राज कपूर यांनी योग्य गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितलं. "मी सुरुवातीला नकार दिला होता. ते (ऋषी कपूर) नग्नावस्थेत येतात आणि टॉवेलने केस पुसतात. त्यांनी तो शॉट दिला.

## शिवांगीच्या कमेंटवर प्रत्युत्तर



अभिनेता गोविंद नामदेव गेल्या काही काळापासून चर्चेत आहेत. त्यांचे नाव ३० वर्षीय अभिनेत्री शिवांगी वर्माबरोबर जोडले गेले होते. असे म्हटले जात होते की ते दोघेही एकमेकांना डेट करत आहेत. शिवांगीने त्यांच्या 'गौरीशंकर गोहरगंज' चित्रपटातील गोविंद यांच्याबरोबरचा एक बीटीएस फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला, तेव्हा या अटकळीला सुरुवात झाली, ज्यामध्ये कॅप्शन होते, 'प्रेमाला वय नसते, मर्यादा नसते.' यानंतर अभिनेत्रीने अभिनेत्याविरुद्ध काही शब्द बोलले, त्यानंतर आता अभिनेत्याने तिला चोख उत्तर दिले आहे.गोविंद नामदेव यांनी अलीकडेच अभिनेत्री शिवांगी वर्माबरोबरच्या व्हायरल झालेल्या फोटोबद्दल बोलताना म्हटले की, हा एक पब्लिसिटी स्टंट होता. त्यांनी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी शिवांगीबरोबर तो फोटो क्लिक केला होता. ७० वर्षीय गोविंद नामदेव यांनी ४० वर्षांनी लहान असलेल्या शिवांगीवर त्यांच्या नावाचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता, त्यानंतर अभिनेत्रीने प्रत्युत्तर दिले होते. तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत लिहिले होते की, 'कोणीतरी बरोबर म्हटले आहे, वाढत्या वयानुसार वृद्ध लोक वेड्यासारखे वागतात.'आता शिवांगी वर्माच्या पोस्टवर गोविंद नामदेव यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ७० वर्षीय अभिनेत्याने हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीचे संगोपन कसे असते, त्याचे संस्कार कसे असतात, तो त्याच विचारसरणीचा माणूस असतो आणि त्यानुसार त्याचे जीवन पाहतो आणि लोकांशी व्यवहार करतो. त्यांची मानसिकता या गोष्टींमुळे तयार होते आणि ते जीवनाकडे पाहण्याच्या आणि इतरांशी संवाद साधण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिबिंबित होते. ही संपूर्ण परिस्थिती त्याचेच प्रतिबिंब आहे. माफी मागण्याऐवजी ती गोष्टी कशा हाताळते हे तिच्या स्वतःच्या समजुतीवर अवलंबून आहे, मी अशा गोष्टींकडे जास्त लक्ष देत नाही.'गेल्या वर्षी गोविंद नामदेव यांनी शिवांगी वर्माबरोबर 'गौरीशंकर गौहरगंज' चित्रपटात काम केले होते. याबद्दल अभिनेत्याने अलीकडेच सांगितले की, गेल्या वर्षी व्हायरल झालेला फोटो चित्रपटाच्या प्रमोशनसाठी काढला होता.

## अन मी रज्जोच्या प्रेमात पडले



'सावळ्याची जणू सावली' ही मालिका अल्पावधीतच मोठी लोकप्रिय ठरली. सारंग व सावलीच्या जोडीने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या मनाविरुद्ध झालेलं लग्न ते मैत्रीपर्यंतचा प्रवास चाहत्यांना आवडला. मालिकेत दाखविल्याप्रमाणे, काही दिवसांपूर्वीच अस्मीचा बॉयफ्रेंड आकारच्या धमक्यांना घाबरून सावलीने सारंगला घटस्फोट दिला होता. आकारने सावलीला सारंगला जीवे मारण्याची धमकी दिली होती. हे तो अस्मीच्या सांगण्यावरून करत होता. सावलीने सारंगला घटस्फोट दिल्यानंतर तिलोत्तमाने लगेच सारंग व अस्मीचे लग्न ठरवले. यादम्यानच, सावलीला अस्मीचे सत्य समजले. सारंग व अस्मीचे लग्न सुरू असताना सावली घोड्यावरून तिथे पोहोचली आणि सर्वांसमोर अस्मीचे सत्य उघड केले. त्यानंतर सारंगने सर्वांसमोर सावलीविषयी त्याचे प्रेम व्यक्त केले.आता सावली म्हणजे अभिनेत्री प्राप्ती रेडकरने या सीनचे शूटिंग करताना काय अनुभव आला याबद्दल वक्तव्य केले आहे. प्राप्ती म्हणाली, "जेव्हा मला कळालेलं की सेटवर घोडा येणार आहे, तेव्हापासून मी उत्साही होते. त्यात मला नऊवारी साडी नेसून घोडेस्वारीचा सीन पूर्ण करायचा होता. हे ऐकल्यावर मला थोडी काळजी वाटत होती, कारण आयुष्यात पहिल्यांदाच मी हे करणार होते. माझ्या आई-बाबांनी माझा आत्मविश्वास वाढवला. मला सेटवरच घोडेस्वारीची ट्रेनिंग दिली गेली. "मला दिग्दर्शक सरांनी विचारलेलं की, तुला बॉडी डबलची गरज आहे का? तेव्हा हा सीन मी स्वतः करणार, असं त्यांना सांगितलं. नऊवारी साडी, नथ, हिरवा चुडा, चंद्रकोर आणि मेक-अप उन्हात सांभाळून घोडेस्वारी करणं आव्हानात्मक होतं. पण, आमचे सीन्स व्यवस्थित शूट झाले.जेव्हा सेटवर घोड्याची एन्ट्री झाली तेव्हा मला कळाले की, तो घोडा नाही तर घोडी आहे आणि तीचं नाव रज्जो आहे. मी सीन्समध्ये तिच्याशी गप्पा मारत होते. मी बोलत होते आणि ती ऐकत होती. मी रज्जोच्या प्रेमात पडले. सीनमध्ये तिला ऊन लागत होतं, तेव्हा तिला सावली मिळेल याची मी काळजी घेत होती. आमच्यात कमी वेळात घट्ट नातं निर्माण झालं होतं. कलाकार म्हणून अनेक वेगळ्या गोष्टी मला करण्याचा अनुभव मिळतो.

## शालू व जब्यानं लग्न केलं आहे का?

नागराज मंजुळे दिग्दर्शित 'फँड्री' हा चित्रपट २०१४ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटातील शालू व जब्या ही पात्रे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती. शालू ही भूमिका अभिनेत्री राजेश्वरी खरात तर जब्या ही भूमिका सोमनाथ अवघडेने साकारली होती. अनेकदा राजेश्वरी व सोमनाथ हे त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंमुळे चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वीच त्यांनी शेअर केलेल्या फोटोंमध्ये त्यांनी डोक्याला मुंडावळ्या बांधल्या होत्या. त्यामुळे त्यांनी लग्न केले आहे, अशा चर्चांना उधाण आले होते. या कलाकारांनी मात्र यावर कोणतीच प्रतिक्रिया दिली नव्हती.आता राजेश्वरी खरातने एका मुलाखतीत यावर वक्तव्य केले आहे. अभिनेत्रीने नुकतीच 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. यावेळी तिला विचारण्यात आले की, राजेश्वरी व सोमनाथचं लग्न झालं आहे का? यावर राजेश्वरी म्हणाली, "मला असं वाटतं की तो प्रश्न सध्या मी गुपितच ठेवते; कारण लग्न झालं आहे की नाही हे लोकांना ठरवू दे. मला थोडा सस्पेन्स ठेवायचा आहे, मी काही दिवसातच आनंदाची बातमी देईन.पुढे राजेश्वरी म्हणाली, "मी सध्या सोमनाथबरोबर बरेच शूटिंग केले आहेत, स्क्रीनवर सोमनाथ व तिचे काही प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत असा खुलासा केला. पण, खऱ्या आयुष्यात त्यांचे लग्न झाले आहे.नागराज मंजुळे दिग्दर्शित 'फँड्री' हा चित्रपट २०१४ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटातील शालू व जब्या ही पात्रे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती.

# जैस्वालकडे मोठा रेकॉर्ड मोडण्याची संधी!

## इतक्या धावा करताच द्रविड- सेहवागला टाकणार मागे



**। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**हेडिंग्लेच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना रंगणार आहे. यावेळी भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी युवा फलंदाज शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. तर उपकर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतकडे असणार आहे. रोहित शर्मा नसल्यामुळे सलामीला फलंदाजीला येणाऱ्या यशस्वी जैस्वालकडून चांगल्या सुरूवातीची अपेक्षा आहे. यादरम्यान जैस्वालकडे कसोटी क्रिकेटमधील मोठा रेकॉर्ड मोडून काढण्याची संधी असणार आहे.**

यशस्वी जैस्वालने आपल्या छोट्याश्या कारकिर्दीत अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. त्याच्या कसोटी कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने आतापर्यंत खेळलेल्या १९ सामन्यातील ३६ डावात ५२.८८ च्या सरासरीने १७९८ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ४ शतकं आणि १० अर्धशतकं झळकावली आहेत. जैस्वाल कसोटी क्रिकेटमध्ये २००० धावांजवळ पोहोचला आहे. त्याने पुढील ३ डावात जर २००० धावांचा पल्ला गाठला, तर मोठ्या रेकॉर्डमध्ये तो वीरेंद्र सेहवाग आणि राहुल द्रविडला मागे सोडू शकतो. आपल्या विस्फोटक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या सेहवागने ४० डावात २००० धावांचा पल्ला गाठला होता.मात्र, हा रेकॉर्ड मोडणं यशस्वी जैस्वालसोबत मुळीच सोपं नसेल. कारण तो पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळणार आहे. त्यामुळे इंग्लंडची परिस्थिती आणि दबाव हा यशस्वीसाठी नवीन असेल. तो हा दबाव हाताळून कशी कामगिरी करणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या अनधिकृत सराव सामन्यात यशस्वी जैस्वालची बॅट शांत राहिली. सराव सामन्यातील ४ डावात त्याला एक केवळ १ अर्धशतक झळकावता आलं आहे. यशस्वीला साथ देण्यासाठी केएल राहुल सलामीला येऊ शकतो. राहुलने इंग्लंड लायन्सविरूद्ध दमदार शतकी खेळी करत सुरूवात केली होती. त्यानंतर इंट्रा स्क्वॉड सराव सामन्यातही त्याने अर्धशतकी खेळी केली.यशस्वी जैस्वालने परदेशात दमदार कामगिरी केली आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीत डावाची सुरूवात करताना त्याने दमदार शतकी खेळी केली होती. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीतील १० डावात त्याने ४३.४४ च्या सरासरीने ३९१ धावा केल्या होत्या. यादरम्यान त्याने १ शतक आणि २ अर्धशतकं झळकावली होती. जर भारतीय संघाला ही मालिका जिंकायची असेल, तर जैस्वालने चांगली सुरूवात करून देणं गरजेचं असणार आहे.यशस्वी

### परदेशात दमदार कामगिरी केली

त्यामुळे इंग्लंडची परिस्थिती आणि दबाव हा यशस्वीसाठी नवीन असेल. तो हा दबाव हाताळून कशी कामगिरी करणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या अनधिकृत सराव सामन्यात यशस्वी जैस्वालची बॅट शांत राहिली. सराव सामन्यातील ४ डावात त्याला एक केवळ १ अर्धशतक झळकावता आलं आहे. यशस्वीला साथ देण्यासाठी केएल राहुल सलामीला येऊ शकतो. राहुलने इंग्लंड लायन्सविरूद्ध दमदार शतकी खेळी करत सुरूवात केली होती. त्यानंतर इंट्रा स्क्वॉड सराव सामन्यातही त्याने अर्धशतकी खेळी केली.यशस्वी जैस्वालने परदेशात दमदार कामगिरी केली आहे. बॉर्डर- गावस्कर ट्रॉफीत डावाची सुरूवात करताना त्याने दमदार शतकी खेळी केली होती. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीतील १० डावात त्याने ४३.४४ च्या सरासरीने ३९१ धावा केल्या होत्या.जर भारतीय संघाला ही मालिका जिंकायची असेल, तर जैस्वालने चांगली सुरूवात करून देणं गरजेचं असणार आहे.

जैस्वालने आपल्या छोट्याश्या कारकिर्दीत अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. त्याच्या कसोटी कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने आतापर्यंत खेळलेल्या १९ सामन्यातील ३६ डावात ५२.८८ च्या सरासरीने १७९८ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ४ शतकं आणि १० अर्धशतकं झळकावली आहेत. जैस्वाल कसोटी क्रिकेटमध्ये २००० धावांजवळ पोहोचला आहे. त्याने पुढील ३ डावात जर २००० धावांचा पल्ला गाठला, तर मोठ्या रेकॉर्डमध्ये तो वीरेंद्र सेहवाग आणि राहुल द्रविडला मागे सोडू शकतो. आपल्या विस्फोटक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या सेहवागने ४० डावात २००० धावांचा पल्ला गाठला होता.मात्र, हा रेकॉर्ड मोडणं यशस्वी जैस्वालसोबत मुळीच सोपं नसेल. कारण तो पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळणार आहे.

# मोठ्या खेळाडूने मला निवृत्तीचा सल्ला दिला!

## करुण नायरचा इंग्लंड कसोटीपूर्वी मोठा खुलासा

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय क्रिकेटप्रेमींच्या नजरा आता इंग्लंडमध्ये होणाऱ्या टीम इंडियाच्या कसोटी सामन्यांवर आहे. भारतीय क्रिकेटमधील एका नव्या युगाला आता सुरूवात होणार आहे. नवा कर्णधार शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखाली नवा भारतीय संघ इंग्लंडमध्ये खेळताना दिसणार आहे. अनुभवी खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीनंतर, करुण नायरा इंग्लंड दौऱ्यावर ७ वर्षांनी भारतीय कसोटी संघात संधी मिळाली आहे.**

भारत आणि इंग्लंडमधील पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी करुण नायरने एक मोठा खुलासा केला आहे.करूण नायरने सामन्यापूर्वी बोलताना सांगितलं की, एका मोठ्या भारतीय क्रिकेटपटूने त्याला निवृत्तीचा सल्ला दिला होता. पण करूण नायरने सातत्याने भारतीय संघासाठी पुन्हा खेळण्याची आपली जिद्द कायम ठेवली आणि आपल्या कामगिरीच्या जोरावर त्याने पुन्हा भारताच्या कसोटी संघात आपले स्थान तयार केले.२०२२ च्या देशांतर्गत हंगामानंतर कर्नाटकने नायरला सर्व फॉरमॅटमधून वगळले होते. करूणने जवळजवळ १४ महिने कोणतेही स्पर्धात्मक क्रिकेट खेळले नव्हते आणि त्यानंतर नॉर्थम्प्टनशायरसह त्याने



काउंटी चॅम्पियनशिप करारासह क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन केले.

नायरने सांगितलं की यादरम्यान एका प्रमुख भारतीय क्रिकेटपटूने त्याला सल्ला दिला की टी-२० लीगवर लक्ष केंद्रित करण्यासाठी निवृत्ती घेतल्यास त्याला आर्थिक सुरक्षितता मिळेल.डेली मेलला दिलेल्या मुलाखतीत नायर म्हणाले, "मला अजूनही आठवतंय की एका मोठ्या भारतीय खेळाडूने मला फोन करून म्हटलं होतं की तू निवृत्ती घेतली पाहिजे कारण या लीगमधून मिळणारे पैसे तुझं भविष्य सुरक्षित ठेवतील. हा निर्णय घेणं सोपं असत, पण मला माहित होते की कितीही पैसे

### नायरने एक मोठा खुलासा केला

नायरने लायन्स विरुद्धचे द्विशतक या वर्षीचे त्याचे ५ वे प्रथम श्रेणी शतक होते.भारत आणि इंग्लंडमधील पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी करुण नायरने एक मोठा खुलासा केला आहे.करूण नायरने सामन्यापूर्वी बोलताना सांगितलं की, एका मोठ्या भारतीय क्रिकेटपटूने त्याला निवृत्तीचा सल्ला दिला होता.

असले तरी, इतक्या सहजपणे हार मानली असती तर मी मलाच दोष राहिलो असतो.मी पुन्हा भारतासाठी खेळण्याचा प्रयत्न करणं कधीचं सोडणार नव्हतो. ही दोन वर्षांपूर्वीची घटना आहे आणि आता पाहा आम्ही कुठे आहोत. हा वेडेपणा आहे पण मला माहितीये मी यासाठी पात्र आहे, असं करूण नायरने शेवटी म्हटलं.नुकत्याच कॅन्टरबरी येथे झालेल्या इंग्लंड लायन्स विरुद्धच्या भारत अ च्या सामन्यात चमकदार कामगिरी केली. त्याने पहिल्याच सामन्यात द्विशतक झळकावलं. याशिवाय त्याने दोन्ही सामन्यांमध्ये भारताच्या धावसंख्येत महत्त्वपूर्ण योगदान दिलं. या कामगिरीसह नायरने भारतीय कसोटी संघाच्या प्लेईंग ११ मध्ये स्थान मिळवण्याचा आपला दावा पुन्हा एकदा बळकट केला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
। दि. 17 जून 2025।-

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या शहरात जोरदार “ब्रॅंडिंग”

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे ‘देवेंद्र पर्व’!

## » मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या विविध विकासकामांचे लोकार्पण

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारलेले विविध प्रकल्प आणि विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते बुधवार, दि. 18 जून रोजी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी संपूर्ण शहरात “विकासाचे देवेंद्र पर्व” असे जोरदार ‘ब्रॅंडिंग’ केले आहे.**





श्रीक्षेत्र देहू - आळंदी पालखी मार्गावरील चऱ्होली येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज यांच्या भेटीवर आधारित संत समुह शिल्पाचे बहुप्रतिक्षीत लोकार्पण मुख्यमंत्री फडवीस यांच्याहस्ते होत आहे. यासोबत, सर्वांत उंच 200 फुटांचा भगवा ध्वज आणि संतसृष्टी प्रकल्पाचे लोकार्पणसुद्धा होणार आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष आण्ण बनसोडे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर आदी उपस्थित राहणार आहेत.

थोरल्या पादुका मंदिर, वडमुखवाडी येथे संतसृष्टी, टाळगाव चिखली येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतीपठमधील सभागृह व कक्ष, 1.50 लाख देशी वृक्ष लागवड मोहीमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या वतीने विकसित ‘ज्येष्ठानुबंध’ ज्येष्ठ नागरिकांकरिता ॲप व ‘ट्रॅफिक बडी’ वाहतूक नियमनाकरिता व्हाट्स ॲप प्रणालीचे लोकार्पण करण्यात येत आहे.

### .... या प्रकल्पांचे होणार भूमिपूजन

प्रभाग क्र. 16 मध्ये मुकाई चौक कृष्णा हॉटेल ते लोढा स्किमपर्यंत एक्सप्रेस आय-वे लगतचा 12 मीटर डीपी सर्विस रस्ता. बापदेव मंदिर येथील किवळे गावातील मुख्य रस्ता ते एक्सप्रेस हायवेपर्यंतचा सिंबायोसिस कॉलेजमागील 18 मीटर डीपी रस्ता, प्रभाग 16 विकासनगर येथील मुख्य रस्ता डांबरीकरण, गवळीमाथा ते इंद्रायणीनगर चौकपर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट स्केपिंग, दिव्यांग नागरिकांसाठी ‘मॅपिंग’ शुभारंभ करण्यात येत आहे.

### ... या प्रकल्पाचे होणार लोकार्पण

संत मदर टेरेसा उड्डापुलावरुन चिंचवड बाजुकडे उतरण्यास व चढण्या बांधलेला लूप-रॅम्प, पवना नदीवर थेरगाव प्र. क्र. 50 मध्ये प्रसुनधाम शेजारी 18 मीटर डीपी रस्त्यावर उभारलेला थेरगाव-चिंचवड पुल, पिंपळे सौदागर येथे गिर्यारोहणासाठी उभारलेली क्लायबिंग वॉल, प्रभाग क्र. 4 दिघी येथे आरक्षण क्र. 2/122 येथे बांधलेली शाळा इमारत, प्रभाग क्र. 3 चऱ्होली येथे चोविसावाडी येथे उभारलेली अग्निशमन केंद्र इमारत, भोसरी प्रभङ्गग क्र. 7 मधील प्राथमिक शाळा इमारत, थेरगाव व भोसरी येथील रुग्णालयाचे मध्यवर्ती निर्जंतुकीकरण विभाग, प्रभाग क्र. 5 मधील सखुबाई गबाजी गवळी उद्यान येथील बहुमजली वाहनतळ इमारतीचे लोकार्पण करण्यात येत आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायम सकारात्मक भूमिका घेतली. शहराचा पाणी प्रश्न, समाविष्ट गावांचा विकास, पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात आल्या. त्यामुळेच सर्वाधिक वेगाने विकसित होणारे शहर म्हणून पिंपरी-चिंचवड नावारुपाला येत आहे. 2014 पासून निरंतर भाजपा महायुती सरकारने शहर विकासाला चालना दिली आहे. आज लोकार्पण आणि भूमिपूजन होणारे प्रकल्प त्याचे उदाहरण आहे. शाश्वत विकासाचे ‘रोल मॉडेल’ म्हणून शहराचा लौकीक व्हावा, अशा ध्येयाने आम्ही काम करीत आहोत.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# माजी विरोधी पक्षनेत्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले!

## पिंपळे सौदागर येथे 'प्राथमिक शाळा क्र. 51' मध्ये स्वागत समारंभ

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**"नवे वर्ग, नवे मित्र आणि नवीन स्वप्नं... शाळेचा पहिला दिवस खासच असतो!" या संकल्पनेतून माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.**



आज नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून, पिंपळे सौदागर येथील प्राथमिक शाळा क्रमांक ५१ मध्ये विद्यार्थ्यांसाठी 'पहिले पाऊल' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे फुले देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर श्री. काटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य किट आणि गणवेशांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला पालिकेच्या संगणक विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता नीलकंठ पोमन, मुख्याध्यापिका सुरेखा गेंगजे , बालवाडीच्या पर्यवेक्षिका मा. खंडागळे मॅडम, आकांक्षा फाउंडेशनचे सदस्य, उद्योजक सोमनाथ खेडेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन वर्षाची सुरुवात आनंददायी व प्रेरणादायी झाली असून, शाळेच्या पहिल्या दिवसाला एक वेगळं व उत्साहवर्धक स्वरूप लाभले.

> "शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी नव्या स्वप्नांना पंख देणारा असतो. शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नसून, व्यक्तिमत्त्व घडवणारे आहे. आज येथे 'पहिले पाऊल' या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून मन आनंदित झाले. या लहानग्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. शाळा ही केवळ इमारत नसून ती संस्कारांची कार्यशाळा आहे. या पिढीला योग्य दिशा देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."
>
> **–विठ्ठल उर्फ नाना काटे,** माजी विरोधी पक्षनेता.

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292